नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे Year - 2nd | अंक - १७३ Issue - 173 | वार रविवार दि. १० नोव्हेंबर २०२४ Blow- Sunday Date 10 November 2024 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# काँग्रेसला ओबीसी आरक्षण संपवायचे : मोदी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



नांदेड : ओबीसीमधील जातींमध्ये काँग्रेस भांडण लावत आहेत. कारण असे भांडण लावून त्यांना त्यांच्या आरक्षणावर घाला घालायचा आहे. त्यामुळे 'एक रहेंगे तो 'सेफ' रहेंगे' असे घोषवाक्य पंतप्रधान नरेंद मोदी यांनी प्रचारसभेत उपस्थितांना म्हणायला लावले. मराठवाड्यात ८० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक झाली आहे. लॉजिस्टिक पार्कमुळे तसेच समृद्धी महामार्गामुळे मराठवाड्यात रोजगारांच्या संधी वाढतील. गेल्या वेळी नांदेडमधून दिल्लीला 'कमळ फूल' पाठवले नव्हते, अशी खंत व्यक्त करून आता ती संधी असल्याचे आवाहन करत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ओबीसी मतांना साद घातली.

दहा वर्षांत ओबीसी पंतप्रधान आहे. तो सर्वांना बरोबर घेऊन चालला आहे. त्यामुळे ओबीसींना वेगवेगळ्या जातींमध्ये विभागण्याचे ठरवले आहे. 'ओबीसी' प्रवर्गाची आेळख पुसून त्यांची विभागणी व्हावी अशी काँग्रेसची इच्छा आहे. त्यामुळे बटेंगे तो संख्या कम होगी. मग तुमचे आरक्षण काढून घेतले जाईल. हे प्रयत्न पंडित जवाहरलाल नेहरूंपासून राजीव गांधींपर्यंत सर्वांनी केले होते. आता तेच काम, तीच चलाखी करून काँग्रेसचे शहजादे करत आहेत, त्यामुळे अशा प्रवृत्तींपासून सावध राहा, असे आवाहन नरेंद्र मोदी यांनी केले. या वेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अशोक चव्हाण यांची उपस्थिती होती.

आदर्श सोसायटी गैरव्यवहारप्रकरणी आरोपींना कारागृहात पाठवू, असे जाहीरपणे सांगणारे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या शनिवारच्या सभेच्या व्यासपीठावर अशोक चव्हाण शेजारीच बसलेले होते. लोकसभेनंतर पुन्हा विधानसभेच्या प्रचारातही दोघांना एकत्र पाहिल्यावर 'आदर्श' प्रकरणावरील वक्तव्याची नांदेडकरांमध्ये चर्चा झाली.





# आमदार अशोक पवार यांच्या मुलाचं अपहरण करून मारहाण केल्याचा गंभीर आरोप

शिरुर : राज्यात विधानसभेच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरु आहे. विविध मतदारसंघात नेत्यांच्या प्रचार सभांचा धडाका सुरु आहे. प्रचार सभांमधून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये राजकीय आरोप-प्रत्यारोपांचं राजकारण तापलं आहे. असे असतानाच राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे शिरूर मतदारसंघाचे उमेदवार अशोक पवार यांच्या मुलाचं अपहरण करुन मारहाण करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार घडल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. यासंदर्भात अशोक पवार यांच्याकडून शिरूर पोलिसांत तक्रार दाखल करण्याची प्रक्रिया सुरु असल्याची माहिती सांगण्यात येत आहे. दरम्यान, या संपूर्ण प्रकरणाबाबत ॲड.असीम सरोदे यांनी पत्रकार परिषद घेत या घटनेची माहिती दिली आहे. तसेच ॲड.असीम सरोदे यांनी पत्रकारांशी बोलताना ऋषीराज पवारची एक व्हिडीओ क्लीप दाखवली आहे. त्यामध्ये अपहरण कशा प्रकारे झाले आणि अपहरण झाल्यानंतर आपल्याला मारहाण झाल्याचा आरोप व्हिडीओ क्लीपमध्ये ऋषीराज पवार याने केला आहे. तो मुलगा घाबरून गेला होता की एवढे पैसे कुठून आणणार? मग त्या मुलाने थोडसं प्रसंगावधान दाखवलं आणि मी बाहेर गेल्यानंतर काही पैसे देऊ शकतो. मी माझे प्रचार करणारे काही लोक आहेत, त्यांना भेटून तुम्हाला काही पैसे देऊ शकतो. मात्र, एवढे पैसे तुम्हाला देऊ शकत नाही. त्यामुळे त्या मुलाला त्यांनी बाहेर सोडलं आणि सांगितलं की, तू जर पैसे दिले नाही तर आम्ही हा व्हिडीओ व्हायरल करू. मग तू याची कल्पना करु शकतो. यानंतर तो मुलगा बाहेर आल्यानंतर त्या ठिकाणाहून निघून जाण्याचा प्रयत्न केला. ज्यावेळी त्याला व्हिडीओ दाखवण्यात येत होता, त्यावेळी याने त्या मोबाईलचाही व्हिडीओ पटकन काढून घेतला. तो व्हिडीओ कोणाला तरी पाठवण्यात आल्याचं लक्षात येत आहे. यासंदर्भात ऋषीराज पवार हा गुन्हा दाखल करण्यासाठी शिरून पोलीस ठाण्यात दाखल झाला आहे. मात्र, गुन्हा दाखल करून घेण्यासाठी पोलीस विलंब लावत आहेत, असा आरोप वकील असीम सरोदे यांनी माध्यमांशी बोलताना केला. ऋषीराज पवार असं सांगत आहे की, एकजण असं म्हटला की जेवणाच्या आधी आपण तिकडे जाऊन येऊ. मिटिंग करू. तो व्यक्ती माझ्याबरोबर प्रचारात देखील फिरला. त्यामुळे त्याच्यावर मी विश्वास ठेवून आम्ही दोघं माझ्या गाडीत बसलो. माझ्या गाडीच्या चालकाने ती गाडी मांडवगण वडगाव रोडला एका ठिकाणापर्यंत नेली. तेथून पुढे चारचाकी गाडी जाणार नाही, असं मला त्या व्यक्तीने सांगितलं. त्या ठिकाणी आधीच दोन दुचाकी बोलवून घेतल्या होत्या. त्या व्यक्तीबरोबर अजून दोनजण सहभागी होते. त्यानंतर आम्ही त्या दुचाकीवर बसलो. पुढे या दोन्ही दुचाकी एका बंगल्यापर्यंत गेल्या. मला त्या ठिकाणी आतमध्ये नेलं आणि बसवलं. मग मला ते म्हटले की दुसऱ्या रुममध्ये या काहीतरी बोलायचं आहे. त्या रूमध्ये गेल्यानंतर एकजण भाऊ कोळपे नामक व्यक्ती आणि आणखी दोघजण रूमध्ये शिरले. त्या ठिकाणी रुमचा दरवाजा बंद केला आणि माझे हातपाय बांधले.

# विद्युत रोषणाईमुळे मंदिर परिसर दिव्यांच्या प्रकाशाने निघाले उजळून

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : येत्या १२ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या कार्तिकी यात्रेच्या सोहळ्या निमित्ताने पंढरपूर येथील विठ्ठल मंदिरावर आकर्षक अशी विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. मंदिर समितीचे प्रवेशद्वार, मंदिराचे शिखर, सात मजली दर्शन मंडप या ठिकाणी रंगीबेरंगी आकर्षक विद्युत रोषणाई केली आहे. विद्युत रोषणाईमुळे मंदिर परिसर दिव्यांच्या प्रकाशाने उजळून निघाला आहे.



आषाढी आणि कार्तिकी एकादशीचा दिवस वारकरी सांप्रदायासाठी प्रचंड आनंद आणि उत्साहाचा दिवस असतो. पंढरपुरात या दोन्ही दिवशी मोठी जत्रा भरते. हजारो भाविक पंढरपुरात दाखल होतात. कार्तिकी एकादशीच्या वारीसाठी महाराष्ट्रासह आंध्रप्रदेश, कर्नाटक अशा विविध राज्यातून शेकडोंच्या संख्येने दिंड्या आणि पालख्या पंढरीत दाखल होत असतात.

# पंतप्रधान देशाचे असतात, पण मोदी मात्र सर्व चांगले प्रकल्प आपल्याच गृहराज्यात पळवून नेतात : खरगेंची जोरदार टीका

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



नागपूर : पंतप्रधान देशाचे असतात. विविध राज्यांना औद्योगिक प्रकल्प, विकास प्रकल्प देण्याचे काम पंतप्रधानांचे असते. परंतु मोदी मात्र सर्व चांगले प्रकल्प आपल्याच गृहराज्यात पळवून नेतात, अशी टीका काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी केली. ते शनिवारी नागपुरात पत्रकार परिषदेत बोलत होते.

खरगे म्हणाले, मोदी आधी काँग्रेसकडून ७० वर्षांचा हिशेब मागत होते. आता ५५ वर्षांचा हिशेब मागत आहेत. आम्ही तर हिशेब देतोच. पण, मोदी साडेतेरा वर्षे गुजरातचे मुख्यमंत्री आणि ११ वर्षांपासून पंतप्रधान आहेत. त्यांनी सुमारे २५ वर्षांचा हिशेब जनतेसमोर ठेवला पाहिजे. गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून योग्यपद्धतीने काम केले असते तर आज त्यांना इतर राज्यांचे प्रकल्प गुजरातमध्ये पळवण्याचे उद्योग करावे लागले नसते. नागपूर शहरात दोन मोठे नेते आहेत. पण, त्यांचा प्रभाव मोदींसमोर टीकत नाही. नागपूरला येऊ घातलेले प्रकल्प गुजरातला पळवण्यात येत आहेत. पण, हे दोन्ही नेते गप्प बसले आहेत. त्यांना आपली खुर्ची टिकावयची आहे. त्यामुळेच तर नागपुरात प्रस्तावित एअरबसचा विमान निर्मिती प्रकल्प गुजरातला नेण्यात आला.

पंतप्रधान मोदी यांच्या कार्यकाळात बुलेट ट्रेनची घोषणा झाली. त्या गाडीसाठी उभारण्यात आलेला पूल कोसळला तरी गाडी काही सुरू झाली नाही. राम मंदिर उभारण्यात आले. तेथे मोदींचे हात लागले आणि पहिल्या पावसात ते गळू लागले. नवीन संसद भवनाचीही अशीची स्थिती आहे. गेल्या दहा वर्षांत सुमारे ४०० रेल्वे अपघात झाले. महाराष्ट्रात छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा उभारण्यात आला. त्या पुतळ्याचे मोदींच्या हस्ते लोकार्पण झाले. तो पुतळा देखील कोसळला. मोदींचे हात जेथे लागतात, तेथे अनर्थ होत होतो, हे दिसून आले आहे, अशी टीकाही त्यांनी केली. पतंप्रधान नरेंद्र मोदी यांनी तत्कालिन राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांना लाल रंगाचे मुखपृष्ठ असलेला संविधानाची प्रत भेट दिली होती. त्यासंदर्भातील छायाचित्र खरगे यांनी पत्रकार परिषदेत दाखवले. प्रकाशकांनी संविधानाचे मुखपृष्ठ कोणत्या रंगाचे छापावे हा त्यांचा अधिकार आहे. परंतु पुस्तकाच्या रंगाचा मुद्दा करून लोकांच्या मूळ प्रश्नांना बगल देण्याचे काम भाजप करत आहे, अशी टीकाही खरगे यांनी केली.

# सुन लो ओवैसी, हे छत्रपती संभाजीनगर आहे, औरंगाबाद नाही, फडणवीस एमआयएमला इशारा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



नवी दिल्ली : विधानसभेच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरु आहे. विविध मतदारसंघात दिग्गज नेत्यांच्या प्रचार सभांचा धडाका सुरु आहे. प्रचार सभांमधून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये राजकीय आरोप-प्रत्यारोपांने राजकारण तापलं आहे. या पार्श्वभूमीवर आज उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची छत्रपती संभाजीनगरमध्ये महायुतीच्या उमेदवारांसाठी जाहीर सभा पार पडली. या सभेत बोलताना देवेंद्र फडणवीस यांनी एमआयएमचे प्रमुख असदुद्दीन ओवैसी यांच्यावर हल्लाबोल केला. सुन लो ओवैसी, हे छत्रपती संभाजीनगर आहे, औरंगाबाद नाही, असा इशारा देवेंद्र फडणवीस यांनी एमआयएमला दिला आहे. छत्रपती संभाजीनगरमध्ये महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी आज आपण एकत्र आलेलोआहोत. सुन लो ओवैसी हे छत्रपती संभाजीनगर आहे. आता कुणाचा बापही आला तरी छत्रपती संभाजीनगर हे नाव बदलू शकत नाही. काल एमआयएमची या ठिकाणी सभा झाली. त्या सभेमध्ये एक महिला म्हणाली की, छत्रपती संभाजीनगर नाव कसं झालं? त्यांना हे माहिती नाही की, छत्रपती शिवाजी महाराजांचा छावा आणि महापराक्रमी धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज होते. ज्या छत्रपती संभाजी महाराजांना पडकण्यासाठी औरंगजेब संभाजीनगरमध्ये येऊन बसला. मात्र, ९ वर्ष छत्रपती संभाजी महाराजांनी औरंगजेबाला झुलवत ठेवलं. एकही लढाई छत्रपती संभाजी महाराज हरले नाहीत. मात्र, फितुरी झाली नसती तर आमचे छत्रपती संभाजी महाराज कधीच औरंगजेबाच्या हातात आले नसते, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.

## अकोल्यात महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ जाहीर सभा

## केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले

# पंतप्रधान आहेत पळणारा चित्ता, म्हणून ते गिरवत आहेत विकासाचा कित्ता

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : मोदीसाहेब अकोल्यामध्ये येत आहेत. आत्ता.. मग का येणार नाही राज्यात महायुतीची सत्ता? पंतप्रधान मोदी आहेत पळणारा चित्ता, म्हणून तर गिरवत आहेत विकासाचा कित्ता अशी कविता सादर करीत रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्य मंत्री ना.रामदास आठवले यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदीं यांचे स्वागत केले.महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ अकोला येथे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या आयोजित जाहीर सभेत ना.रामदास आठवले बोलत होते.



यावेळी बोलताना ना.रामदास आठवले यांनी वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांना एकत्र येण्याची साद घातली. तुकड्या-तुकड्या विखुरलेला समाज एकत्र करण्यासाठी प्रकाश आंबेडकरांनी आमच्याबरोबर यावं. त्यांनी पक्षाचं अध्यक्ष व्हावं. मी दुसरं कोणतही पद घ्यायला तयार आहे. मी त्यांना मोदींकडे घेऊन जाईल. आम्ही दोघंही एकत्र येऊ, सोबत मिळून थोडं-थोडं खाऊ, असे मिश्किल भाष्य ना.रामदास आठवले यांनी केले.

अकोल्यात आज महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ जाहीर सभा आयोजित करण्यात आली होती. या सभेला पंतप्रधान मोदी यांच्यासह केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले, प्रतापराव जाधव, राष्ट्रवादीचे नेते प्रफुल्ल पटेल, उपस्थित होते.

राज्यात विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरु झाली आहे. ठिकठिकाणी प्रचारसभा सुरु आहेत. या सभांमध्ये राजकीय नेत्यांकडून एकमेकांवर टीका टिप्पणी आणि आरोप प्रत्यारोपाच्या फैरी झाडल्या जात आहेत. अशात आताच आता रामदास आठवले यांनीही त्यांच्या कवितेतून जोरदार फटकेबाजी केली आहे. अकोल्यात आज महायुतीची सभा

अकोल्यात आज महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ जाहीर सभा आयोजित करण्यात आली होती. या सभेला पंतप्रधान मोदी यांच्यासह केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले, प्रतापराव जाधव, राष्ट्रवादीचे नेते प्रफुल्ल पटेल, शिवसेनेचे ( एकनाथ शिंदे) नेते आनंदराव अडसुळ उपस्थित होते. यावेळी बोलताना, रामदास आठवले यांनी त्यांच्या खास शैलीत विरोधकांवर हल्लाबोल केला.

# पत्रकार सुरेश मिसाळ यांचे हृदयविकाराच्या तीव धक्क्याने निधन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



इंदापूर प्रतिनिधी/अतुल सोनकांबळे : इंदापूर शहरात राहणारे पत्रकार सुरेश (तात्या) मिसाळ यांचे वयाच्या ४० व्या वर्षी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. सुरेश मिसाळ हे मागील २५ वर्षांपासून पत्रकारितेत कार्यरत असून विविध वृत्तपत्रांमध्ये त्यांनी वार्ताहर म्हणून काम केले आहे. इंदापूर तालुक्याच्या विविध समस्या त्यांनी आपल्या लेखणीच्या माध्यमातून मांडल्या आहेत. मिसाळ यांची निर्भीड पत्रकार तसेच सामाजिक कार्यकर्ता म्हणून ओळख होती.

सुरेश मिसाळ यांना काल (दि.८) रोजी दुपारी ३.०० वाजता त्रास होऊ लागला. लगेच त्यांना तातडीने अकलूज येथील खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यावेळी उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. आज (दि.९) रोजी सकाळी ९.३० वाजता त्यांच्यावर इंदापूर येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी माजी मंत्री हर्षवर्धन पाटील, इंदापूरचे आमदार दत्तात्रय भरणे तसेच युवानेते प्रवीण माने तसेच पत्रकार व हजारो नागरिक सुरेश मिसाळ यांना अखेरचा निरोप देण्यासाठी स्मशानभूमीत उपस्थित होते. पत्रकार सुरेश मिसाळ यांच्या पश्चात पत्नी, मुलगी, तीन भाऊ, वहिनी व बहीण असा परिवार आहे.

**इंदापूर शहरासह तालुक्यात हळहळ व्यक्त**

## पत्रकारांना जिवंतपणी मदत करा मेल्यावर काय उपयोग

**आज कळालं पत्रकारांना मेल्यावर पैसे मिळतात ते. जिवंतपणी पॅकेज साठी आमदारकीच्या प्रत्येक उमेदवाराकडे जाऊन ऊंबरठे झिजवले पण, बघू , करू, देऊ, आसे उतर आले., पण मयत जळतानाच इंदापूर विधानसभा मतदारसंघातून निवडणूक रिंगणात उतरल्या तीन्ही उमेदवारांनी साडे सात लाख रूपये दिले हेच पैसे त्याला जिवंतपणी मिळाले आसते तर. .. पण नाही मिळाले. मेल्यावर मिळाले.**

दैनिक
# यश सिद्धि न्यूज



# भविष्याचे गुन्हेगार कोण कोण?

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

गुन्हेगारांची निश्चिती ही ज्या व्यवस्थेत ठरवता येत नाही. ती व्यवस्था गुंतागुंतीची आणि अन्यायाची तयार होत राहते .आज भारतीय समाज व्यवस्थेत सर्व क्षेत्रातील या प्रवृत्ती वाढत असूनही इतरजनांना गुन्हेगार ठरवण्याची वृत्ती वाढत आहे. गुन्हे हे अनेक प्रकारचे असतात. कायद्यासहितेनुसार गुन्ह्यांच्या निरसनासाठी काम करणारी पोलीस व न्याय यंत्रणा आहे .पण विचार क्षेत्रात, ज्ञान क्षेत्रात काम करणारे असंख्य जन हे गुन्हेगारी क्षेत्रात समाविष्ट होतात. तेव्हा गुन्हेगारीचे साम्राज्य नुसते. वाढतच नाही. तर विचार क्षेत्रातील गुन्हेगारीमुळे आपण समाजाला पुन्हा निर्मम अत्याचाराच्या दाडे खाली देत असतो. भारताच्या वर्तमान काळात असे सर्व क्षेत्रातील वातावरण निर्माण झाले नाही काय?

भारतीय जन समाजाच्या मनात हिंसेचे भय हे शतकानू शतके दाटून राहिले आहे ,त्यामुळे भारतीय जनमनाची मानसिकता विचार अविष्काराच्या निर्भयतेची पूर्णतः निर्माण झाली आहे .असे म्हणता येत नाही. आणि त्यामुळेच इतिहासाच्या अनेक टप्प्यावर हा समाज असत्य स्वीकारत दंतकथा खऱ्या मानत तो मूक होऊन जगत आलेला पहावयास मिळतो .पण हे मौन निर्माण का होते? समाज मूक का होतो? समाजाची निर्भयता समाजाची अक्षर साक्षरता कित्येक शतके काढून घेतल्यामुळे समाज मुकआणि निरक्षर पद्धतीने वर्तन करतो. असे तर होत नाही ना. काही अंशी ही समाजशास्त्रीय आणि भौगोलिक इतिहास परिणामाची कारणे असू शकतील एवढेच याला महत्त्व आहे. मूक समाज निर्माण करणे .ही एक प्रभुत्वाची हुकमी विकृती असते मूक समाज सहजासहजी तयार करता येत त्या समाजातील विचार करणारे बोलणारे लिहिणारे लोक यांना मोठे मोठे बक्षीस आतून पुरस्कारातून सन्मानित करणे आणि व्यवस्थेच्या शोषणाचे समर्थक बनवणे हे नित्य वर्तन संस्कृतीच्या आदी मान्यतेच्या राजकारणाचा भाग म्हणून इथे धूर्त चाणाक्ष करत असतात .महाराष्ट्रात याचे सर्वात जास्त प्रमाण आहे. अभिजनाची अधिकारशाही महाराष्ट्राची प्रभुतुशाही आहे प्रभुत्व शाही हि सवर्णशाही आहे. प्रभुत्वशाहीचे अंतरंग केवळ सवर्णच आहेत .असे नाही तर शोषण करणारे सर्व वर्ग सर्व जाती यामध्ये समाविष्ट आहेत पुरोहित वैदिक क्षेत्रीय यांना अधिकार शाहीची नशा सर्व कालखंडात असलेले आढळून येते. ते समाजाला विरोध होऊ नये म्हणून सतत मुक तयार करत असतात. केवळ ते बोलू देत नाही. असे नाही .केवळ ती लिहू देत नाहीत. असे नाही तर बोलणारे लिहिणारे यांना बहिष्कृत करून उपेक्षित ठेवतात .आणि समाजाच्या चर्चा विश्वापासून वंचित व बेदखल पात्र करतात एवढेच करूनही झाले नाही तर या बोलणारे आवाज विचार करणारी निर्भयपणे यांना शरीर रूपाने संपवले जाते. भारतातील येवू घातलेला फाशीवाद २०१ ० चां पासून धूर्त हळुवार पावलाने पुढे सरकतो आहे .त्याने विचारवंत क्षेत्रातील अनेकांचे खून करून विचार क्षेत्रात संदेश दिला आहे आणि अत्याचारा पूर्वीची मुक शांतता कायम कशी निर्माण होईल याची व्यूहरचना यशस्वी झाली आहे.

विचाराची हत्या होत नाही . असे घोषणेने म्हटले जाते पण इतिहास सांगतो विचाराची हत्या माणसाच्या हत्या केली की होते आणि समाज विचारापासून परावर्त करता येतो तो मूक बनवता येतो त्या सम काळात विचाराचे अनुयायी वाहक विश्लेषक विचार सर्वजूर पोहोचवणारे प्रबोधक या सर्वांच्या मनामध्येम ध्ये मरण शांतता तयार करून त्यांना विचार निर्भय प्रकटीकरणापासून दूर हटवता येते हे काम भारतातील नव भांडवली कंपनी पुरस्कृत अधिक वर्णवादी अधिक एकाधिकारशाहीवादी अधिक एक राष्ट्र एक वंशवादी यांनी पुढे चालवले आहे हे थोडे संमिश्र स्वरूप असल्यामुळे जनसामान्यांना हे समजत नाही. भारतीय समाज सतत स्वातंत्र्य आणि गुलामी या दोन्ही पुढे आणि पाठीमागे अवस्थात का जातो याचा विचार? थांबवायचं असेल तर विचारवंतांच्या मनात भीती तयार करणे आणि त्यांना मौन धारणा प्राप्त करा असा अप्रत्यक्ष इशारा देऊन त्यात त्यांना सुरक्षित जगण्याची खात्री देणे हे भारतात चालू आहे याचा दुसरा परिणाम सर्व क्षेत्रातील छोटे-मोठे विचारक विश्लेषक प्रबोधक ज्ञान भाषेमधील अॅकॅडमीशन इंटरॅक्शन हे सर्व मरणशांततेच्या पूर्वकाळात जीवन जगत आहेत या त्यांच्या गुन्हेगारी वर्तनाचे विश्लेषण करण्याचा प्रयत्न इथे केला आहे वर नमूद केल्याप्रमाणे गुन्हेगारी ही एका विशिष्ट क्षेत्रातच निश्चित नसते ज्ञान क्षेत्रात विचार क्षेत्रातील गुन्हेगारी ही सर्वात घातक आणि दीर्घ परिणाम करणारी असते आणि म्हणूनच विचारवंतांचे भय ही त्या समाजाची स्वातंत्र्य गमावणारी व गुलामी पूर्वीची अवस्था असते त्या समाजाचे संस्कृतीशी पुरातन संघर्षाचे भांडण सुरू होत असते भारतीय समाजात आज पुनर्जीवनवादी आणि वैदिक पुरोहित आणि क्षत्रिय हे एकत्रित आले असून त्यांना शोषणासाठीचा व्यापक शूद्र जातींचा अन्नधर्मीयांचा मोठा जनप्रदेश कायम हातात हवा आहे म्हणून ते विचारवंतांना मुके बनवत आहेत.

स्वातंत्र्यपूर्व काळातील विचारवंत हे स्वातंत्र्यसैनिक होते ते आंदोलन होते ते सत्याग्रही होते ते कार्यकर्ते होते ते विचाराचे अनुयायी आणि समाज जीवनातील सुखदुःखाचे साथी होते स्वातंत्र्य उत्तर काळात माध्यमाने आणि आदी मान्यता देणाऱ्या वर्गांनी तयार केलेले विचारवंत हे विश्लेषक आहेत हे विचारसरण्यांचे दोष दाखवणारे छद्मी विचार विश्लेषक आहेत ते विचाराचा विस्तृत व्यापक् पट दाखवून वाचकांना भाषिकांना नेहमी चकवत आले आहेत सम काळातील संघर्ष टोकाचा दाखवण्याचे धाडस त्यांनी दाखवले नाही संघर्षाच्या अग्रभागी लढ्याचे नेतृत्व विचारवंतांनी महाराष्ट्रात अभावानेच केल्याचे आढळून येते तुरळक नेते तुरळक आंदोलक तुरळक सत्याग्रही महाराष्ट्रात आढळून येतात कृतिशील क्षेत्रातून निर्माण झालेली विचारवंत यांना मानवी हक्काचे लढ्याचे सैनिक असूनही त्यांना राष्ट्रद्रोही ठरवून समाज मनाच्यापासून दूर हटवले जाते अर्बन नक्षल अनारकिष्ट असे कुविशेषण देऊन प्रत्यक्षात मानवमुक्तीच्या हक्कासाठी लढणाऱ्या अनेकांना विचार क्षेत्रातून गारद केले जाते मार्क्सवादी वडील होते म्हणून त्यांची मुले गुन्हेगार ठरवली जातात हा जागतिक व्यापक साम्राज्यवाद्यांचा कट भारतात सुद्धा खेळला जातो आहे चालवला जातो आहे त्यामुळे विचार न करणारा भयग्रस्त असा समाज सभोवताली मोठ्या प्रमाणात वाढतो आहे

नोव्हेंबर २०२४ मध्ये महाराष्ट्रातील शिक्षण क्षेत्र विचारक्षेत्र साहित्य क्षेत्र कलाक्षेत्र संभ्रमावस्थेत आहे त्यांना संविधान आपले हित आपल्या सम काळातील युवकांचे प्रश्न याबद्दल काही देणे घेणे नाही या सर्व क्षेत्रातील विचारवंत हे कोण आहेत? हे काय करीत आहेत? व्यवस्था परिवर्तनाच्या साठी सतत समाजसिद्ध होऊ नये म्हणून सण उत्सव आनंद महोत्सव आणि संस्कृतीच्या चक्रात ज्या पुरोहित ब्राह्मणी व्यवस्थेने इथल्या सामान्यजणांना अडकून ठेवले आहे त्यांना छदम्म आनंदात व्यवस्थेच्या गुलामीत राहा असा अप्रत्यक्ष गुलामी मानसिकतेचा कायम प्रभाव निर्माण केला आहे. त्यामुळे इथे व्यवस्था परिवर्तनाची चर्चा होत नाही इथे बदनामीची चर्चा होते इथे भ्रष्टाचार गुन्हेगारी आणि अत्याचार याची चर्चा होत नाही इथे जात आणि वंश आणि प्रभुत्व आणि सरंजामशाही याची चर्चा होते असा समाज विचार शून्य अवस्थेकडे निघाले ची लक्षणे आहेत इथल्या विचारवंताचे घात पात झाल्यापासून महाराष्ट्राचे विचारविश्व हे ब्राह्मणी प्रभुत्ववादी शक्तींच्या भयाने ग्रासलेले असून ते आदी मान्यता पुरस्कार पद प्रतिष्ठा यांच्या आशेने वरिष्ठ अभिजनांकडे पाहत जीवन जगत आहे शिक्षण क्षेत्रातील दारून अवस्था आहे

स्वातंत्र्य गमवावे लागत असताना विचारवंत आत्मघातापूर्वी जेव्हा मोहन बाळगतात आणि कृतक प्रतिष्ठेच्या प्रेमात जीवन जगत राहतात तेव्हा बहिग्रस्त शोषणाने जर्जर झालेला समाज हा गुलामीच्या वाटेने चालू लागतो हे भारतात कमी जास्त स्वरूपात सर्वत्र चालू आहे विचार असहमतीला वाव नाही विचार अभिव्यक्तीला वाव नाही विचार विश्लेषणाला संधी नाही सर्व क्षेत्रातील मूल्याधिष्ठित स्वातंत्र्य प्रस्थापित व संवर्धित करण्यासाठी रास्त पर्यावरण नाही अशा समाजात एक स्वतःचे सार्वभौम राजकारण हीच जेव्हा अंतिम गोष्ट बनते तेव्हा समाजाच्या सर्व क्षमतांचा नाश झालेला असतो जगभर विचार थक्क ठरलेला अल्बर्ट कामू याचा ७ नोव्हेंबर हा जन्मदिन विचार विश्लेषकाचा जन्मदिन म्हणून साजरा झाला त्यावर खूप चर्चा झाली

कल्पनांचे वास्तव विचारसरण्यांची अपरिहार्यता आणि विचारसरणीचे अंतर्गत संघर्ष मांडण्यात विचारवंत धन्य मानतात म्हणून ते सम काळात गप्प बसतात विचारनिर्भयता दाखवत नाहीत नेतृत्वासाठी पुढे येत नाहीत पद प्रतिष्ठा सांभाळण्यात मश्गुल राहतात हे भारतीय विचारवंताचे आजचे सर्वात जास्त दुःखदायक चित्र आहे भारतीय विचारवंत सर्व क्षेत्रातील हे विश्वासघात की आणि समाजाला गुलामीच्या अवस्थेकडे नेणारे गुन्हेगार आहेत असे विधान धाडसाने करणे कोणीच मान्य करणार नाही.

ही विकारी पूर्वग्रह दूषित टीका समजली जाईल परंतु विचाराचे भविष्यकालीन स्वरूप व धूर्त फाशीवादाची पावले मांडण्यासाठी दाखवून देण्यासाठी संकटाचा पर्दाफाश करून शकणारे विचारवंत हे समाजाशी वर्तमानातील गद्दार असतात ते प्रतीक वाद्यांच्या दृष्टीने राष्ट्रद्रोही नसले तरीही ते विश्वासघातकी ठरतात कारण पुढच्या पिढ्यांचे सगळे अधिकार जीवन जगण्याचे आशावादी स्वप्न वर्तमान काळातील त्यांच्या निष्क्रिय वांज भूमिकांच्या मुळे भंग पावलेले असते हे ते मान्य करत नाहीत स्वातंत्र्यपूर्व काळात आंदोलन सत्याग्रही आणि विचारांचे अनुयायी यांना हा विचार समजत होता भविष्यातील पिढ्यांच्या स्वातंत्र्यमय अवकाशासाठी साम्राज्यवाद्यांच्या विरुद्ध हौतात्म्या पत्करले पाहिजे तुरुंगवास भोगला पाहिजे पद प्रतिष्ठा नाकारली पाहिजे असंतोष स्वीकारला पाहिजे हा त्या पिढीचा विचार आज नोव्हेंबर २०२४ मध्ये भारतीय समाजात फारच कमी प्रमाणात आढळून येतो इतका विसंगत इतिहास व भविष्य निर्माण होऊ शकते याच्या आश्चर्य वाटल्या वाचून राहत नाही

फासीवाद हेच ते काम नित्य करत असतो तो शितकालात काही वेळासाठी जात असतो स्वातंत्र्याच्या अवकाश अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य या घोषणातून होऊ देतो आणि पुन्हा नृशंस हिंसा करत पुढे कराल काळाची जीभ उघडी ठेवतो आज भारतात हे कमी जास्त प्रमाणात सुरू झाले आहे आणि भारतीय जन समाजाला समकाळातील हे विचार हे विश्लेषक हे ज्ञान निर्माण करते शांत आहेत मूक आहेत याच्या आश्चर्यही वाटत नाही समाज मात्र यांच्या पालख्या खांद्यावर घेऊन यांना श्रेष्ठ कालदर्शिका ठरवण्यामध्ये भक्तीचा पसारा मांडत राहतो आपले आपल्या विचाराचे क्षत्रियत्व सिद्ध करण्याचा निंदनीय अशोभनीय प्रयत्न तो करत राहतो आज सभोवताली हे सर्व त्र चालू आहे यांनी समाज दुःख निर्मूलनासाठी उपयुक्त वर्तमानात काही भूमिका घेतलेल्या नसतात कृतिशील आंदोलने केलेली नसतात तरीही भारतीय समाजात हे विचार आदर्श शिरोधार्य मानले जातात हा भारतीय समाजाचा गुलामी वर्तनाचा प्रकार आहे . दुसरे तिसरी काहीही नाही.

प्रखर भावनिकता निर्माण होऊ न देणे म्हणजे विचाराला वाव न देणे संवेदनशीलता मारणे म्हणजे बांधिलकीचा भवताल निर्माण होऊ देणे विषमतेच्या दर्या निर्माण करणे म्हणजे बंधुता रोखणे होय प्रत्येक वर्ण आणि वंश जाती या विभाजित ठेवणे म्हणजे एकमेका अंतर्गत स्वयंकेंद्रित श्रेष्ठत्व निर्माण करत राहणे आणि टोकाची इतरांच्या प्रति तुच्छता आणि अविश्वास धुर्तपणे निर्माण करणे हे भारतीय समाजाचे शतकाल शतकाचे काम समकाळामध्ये वेगाने आता चालू झाले आहे या समाजाला समाज नावाची विशेषणे देणे ही सुद्धा चूक ठरते.

जगात पुढच्या पिढ्यांचाही विचार केला जातो त्यांच्या जगण्याच्या अधिकार आणि स्वातंत्र्याचे अवकाश हे अभावतीत राहिला हवे असाही विचारवंत विचार करून त्यासाठी कृती करत राहतात भारतात मात्र उदयनमुख समाजाचे धूसर चित्र समाजाला चालते भविष्याच्या बद्दल सतत अज्ञानात राहणार भविष्याकडे पाठ फिरवणारा समाज आकस्मातल्या कल्पना आणि आंदोलने आणि विचारसरणी यावर विश्वास ठेवून वाटचाल करणारा भारतीय समाज हा नेहमी उज्वल भविष्याकडे जाण्याऐवजी पुन्हा पुन्हा पराभूत विचारसरणीच्या व व्यवस्थांच्या संकटात अडकत चालला आहे हे स्वातंत्र्यप्राप्तीनंतरचे सात दशकातील अवस्थांतर दाखवून देता येते हा सर्वच भविष्यकाळ हा अंधकार मय आहे असे नाही भारतीय समाजाला काळाच्या पलीकडे जाणाऱ्या व्यवस्थेच्या कल्पना सापडत नाहीत त्या कल्पना मांडण्याची प्रयत्न होत नाहीत हा इथल्या विचारवंताचा सततचा मृत्यू आहे इथले विचारवंत इतिहासाच्या हिंसेच्या प्रदेशात वर्तमनाची उत्तरे शोधत आहेत पराभूत विचारसरणीच्या व कथानकांच्या मध्ये मानवी जीवनाचे सत्य आणि व्यवस्थांच्या निर्माणचा पुनर्रपी तो प्रयत्न रास्त आहे की काय? असे ही समर्थन ते करत आहेत.

आणि म्हणून फक्त भीती असलेला विचार नसलेला भविष्य नसलेला पद आणि प्रतिष्ठा हव्यास असलेला संवेदना नसलेला छद्मी विचार विश्लेषणाच्या खेळात पटाईत असलेला व गुलामीच्या वाटांवर सर्वांचे सोबत चालू राहणारा हा आधुनिक गुन्हेगार सर्व समाजात जो आहे त्यांनी आपणही अर्बन नक्षल व अनारकिस्ट या कु विशेषण पेक्षा स्वयं गुन्हेगार आहोत. हे थोडे समजावून घेतले तर समकाळ त्यांना माफ करेल अन्यथा पुढील पिढ्या त्यांच्या भविष्याच्या अधिकार भारतीय लोकशाहीमध्ये ज्यांनी संपुष्टात आणले त्यामध्ये या ज्ञान क्षेत्रातील सर्व राजकीय विश्लेषक सह सर्व विचारवंत या जबाबदार होते असा गुन्हाशाबित करेल हे मात्र निश्चित होईल.

**– शिवाजी राऊत (सातारा)**

# निवडणूक निर्णय अधिकारी प्रा.खडसे यांच्या अर्धांगिनी निता संजय खडसे यांच्या आवाजामध्ये स्वरबद्ध केलेले निवडणुकीच्या गीताने आजच्या प्रशिक्षणाची सुरूवात

दैनिक यश सिध्दी न्युज नेटवर्क

बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी/राहुल साबळे :

मा. भारत निवडणूक आयोगाने महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ करिता निवडणूक कार्यक्रम घोषित केलेला असून दिनांक १५ ऑक्टोबर २०२४ पासून आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आलेली आहे. सदर निवडणुकीच्या अनुषंगाने दिनांक ८ नोव्हेंबर २०२४ व ९ नोव्हेंबर २०२४ रोजी मतदान केंद्राध्यक्ष व मतदान अधिकारी यांचे दुसरे प्रशिक्षण सहकार विद्या मंदिर सिंदखेड राजा येथे मा. निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी प्रा. संजय खडसे यांच्या अध्यक्षतेखाली होत आहे.



मा. निवडणूक निर्णय अधिकारी प्रा.खडसे यांच्या आणि सौ. निता संजय खडसे यांच्या आवाजामध्ये स्वरबद्ध केलेले निवडणुकीच्या गीताने आजच्या प्रशिक्षण वर्गाची सुरुवात करण्यात आली. आनंदमय वातावरणात आजचे पहिल्या दिवसाचे प्रशिक्षण पार पडले.

प्रशिक्षण दरम्यान भारत निवडणूक आयोग यांची कायदे,तरतुदी आणि अद्ययावत सूचना यांची माहिती सांगण्यात आली. ईव्हीएम, व्हीव्हीपॅट कार्यप्रणाली यांच्या बद्दल सविस्तर माहिती सांगण्यात आली, टपाली मतपत्रिका व निवडणूक कर्तव्य प्रमाणपत्र अर्ज व नमुने यांचा अहवाल भरणे बाबत माहिती सांगण्यात आली. मतदान संकलन केंद्रावर ईव्हीएम तसेच मतदान साहित्य ताब्यात घेणे,सूचीनुसार साहित्य तपासणी करणे, ईव्हीएम तपासणी करणे, टपाली मतपत्रिका घेतली असेल तर स्वतःचे मतदान करून घेणे याबद्दलची सविस्तर माहिती देण्यात आली. मतदानापूर्वी कोणकोणत्या गोष्टीची काळजी घेतली पाहिजे याबद्दल प्रा.खडसे यांनी सांगितले कि, मतदान केंद्र उभारणी करणे,अभीरूप (मॉकपोल) मतदान घेणे, कंट्रोल युनिट मधून अभिरुप मतदान नष्ट करणे, ततझढ मधील अभिरूप मतदान चिठ्ठ्या करणे सील करणे याबद्दलची दक्षता घेतली पाहिजे यावर खडसे यांनी भर दिला.

प्रशिक्षणामध्ये प्रत्यक्ष मतदान सुरू करण्यापूर्वीची कामे कशाप्रकारे पार पडली पाहिजे आणि त्याची दक्षता कशी घेतली पाहिजे याबद्दल प्रा. खडसे यांनी काही महत्त्वाच्या गोष्टीं सांगितल्या, प्रत्यक्ष मतदनाला सुरुवात करताना मतदान अधिकारी यांनी त्यांची कामे कशाप्रकारे पार पडली पाहिजेत तसेच मतदान केंद्राध्यक्ष यांनी महत्त्वाच्या प्रसंगी करावयाचे कार्यवाही याबद्दल त्यांना माहिती सांगण्यात आली.

एतच् मशीनच्या वापराबद्दल आणि त्याच्या हाताळणी बद्दल ईव्हीएम प्रशिक्षण कक्षाचे नोडल अधिकारी उद्धव मांटे आणि सहाय्यक नोडल अधिकारी शिवानंद वाकदकर, सुशील शिलवंत यांनी सर्व मतदान अधिकारी व मतदान केंद्राध्यक्ष यांना खूप चांगल्या प्रकारे मार्गदर्शन केले. मतदानादरम्यान मतांच्या गोपनियते बाबत माहिती देणे,मतदान सुरू केल्याची घोषणा करणे, मतदान केंद्राध्यक्ष यांनी दैनंदिनी मध्ये घटनांची नोंद घेणे, निवडणूक निर्णय अधिकारी यांना मतदान स्थिती आकडेवारी कळविणे इत्यादी गोष्टी मतदानादरम्यान करायला पाहिजे याबद्दल सरांनी मुद्देसूद माहिती दिली.

सर्व मतदान केंद्राध्यक्ष आणि मतदान अधिकारी यांना मास्टर ट्रेनर द्वारे प्रत्यक्षपने प्रात्यक्षिक करून ईव्हीएम मशीन कसे हाताळायाचे याचे प्रशिक्षण देण्यात आले, त्या प्रात्यक्षिक कक्षाची पाहणी सहायक निवडणूक निर्णय अधिकारी मुकेश माहोर यांनी केली, सोबत नायब तहसीलदार सायली जाधव, सहायक नोडल अधिकारी प्रसारमाध्यम प्रकाश शिंदे, मतदान अधिकारी श्रीकांत बुलबुले, पी. जे. दंदाळे उपस्थित होते.

या दोन दिवसाच्या प्रशिक्षणा दरम्यान आज पहिल्या दिवशी मतदान अधिकारी, झोनल अधिकारी,मास्टर ट्रेनर यांना प्रशिक्षण देण्यात आले, सोबत निवडणूक साहित्य स्वीकृती व तपासणी बाबत मार्गदर्शन सूचना करण्यात आले, मतदानाच्या एक दिवस अगोदरची मतदान केंद्रावरील पूर्वतयारी कशाप्रकारे असायला हवी याबद्दल काही सूचना प्रा. खडसे यांनी दिल्या आहेत. आजचे प्रशिक्षण खूप आनंददायी वातावरणात पार पडले,जवळपास एकूण ८०० अधिकारी कर्मचारी यांना आज प्रशिक्षण देण्यात आले. दुपारी प्रशिक्षणामधील सर्व प्रशिक्षणार्थींना जेवणाची उत्तम सोय करण्यात आली होती.

या दोन दिवसाच्या प्रशिक्षणासाठी तहसीलदार सिंदखेड राजा अजित दिवटे, तहसीलदार देऊळगाव राजा वैशाली डोंगरजाळ, गट विकास अधिकारी सिंदखेड राजा मुकेश माहोर,निवडणूक नायब तहसीलदार सिंदखेड राजा मनोज सातव, निवडणूक नायब तहसीलदार देऊळगाव राजा प्रवीण घोटकर,नायब तहसीलदार देऊळगाव राजा सायली जाधव, नोडल अधिकारी श्री गावंडे, प्रसार व प्रचार माध्यम नोडल अधिकारी अंकुश म्हस्के, संजय सोनुने तसेच इतर अधिकारी उपस्थित होते.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर शाला प्रवेश दिन

# शिक्षण क्षेत्रातील ज्ञान प्रेरणेचा दृढ संकल्प दिन : शिवाजी राऊत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सातारा/प्रतिनीधी : भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचा शाला प्रवेश दिन महाराष्ट्रातील तमाम शिक्षण क्षेत्रात ज्ञानाची अखंड ज्ञान लालसा जीवनभर जपू असा दृढ निषे करण्याचा दिवस आहे ज्ञान आणि डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचा प्रवेश ज्या शाळेतून निर्माण झाला ती ज्ञान प्रेरणा शिक्षण क्षेत्राला गतिमान करते असे विचार शिक्षण अभ्यासक शिवाजी राऊत यांनी व्यक्त केले.

सातारा आयटीआय येथे आयोजित डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या शाला प्रवेश दिनाच्या व्याख्यान प्रसंगी राउत बोलत होते कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विचार मंचावर प्राचार्य मांगलेकर प्राध्यापक टेके प्रा. हे उपस्थित होते.

सातारा जिल्ह्यात सातत्याने सातारा आयटीआय मध्ये भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचा शाला प्रवेश दिन दरवर्षी ७ नोव्हेंबर रोजी आयोजित करून विद्यार्थ्यांच्या मध्ये वाचन प्रेरणा ज्ञानाची लालसा निर्माण करण्याचे प्रयत्न आयटीआय करते ही बाब अभिनंदन आहे असे सांगून राऊत आपल्या भाषणात म्हणाले की अक्षर आणि माणूस यांचे नाते भारतीय संस्कृतीच्या प्राचीन काळात तोडले गेले होते स्वातंत्र्यपूर्व काळातील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी अक्षर वाचन आणि आयुष्यभर ज्ञानसाधना करून भारत वर्षाला ज्ञानाचे भांडार उपलब्ध करून दिले आहे त्यांनी धर्म संस्कृती अर्थकारण लोकशाही राज्यव्यवस्था या अनेक विषयांवर जीवनभर ज्ञानसाधना करून ग्रंथ लेखन केले हे सामर्थ्य त्यांना ज्या शाळेतून प्राप्त झाले तो दिवस अभिवादनाचा दिवस म्हणून न साजरा करता व समकाळातील विद्यार्थी व शिक्षण क्षेत्रात ज्ञानाचा दृढनिश्चय करण्याचा दिवस म्हणून साजरा केला गेला पाहिजे असे सांगून राऊत म्हणाले की अक्षरे सत्याकडे माणसांना नेतात अक्षरे शोषणमुक्त विचाराकडे पोहोचतात अक्षरातून उदारता अहिंसा समानता आणि स्वातंत्र्याचा अवकाश प्राप्त होतो हे सर्व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी जाणले होते म्हणूनच त्यांनी विश्वविख्यात भारतीय संविधान भारत देशाला दिले आहे याची यथार्थ जाणीव ठेवून वर्तमानातील विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनाचा पाया विचाराच्या वाचनातून सुधारकांच्या चरित्रातून संविधानाच्या अध्ययनातून रचला पाहिजे ही प्रेरणा डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या शाला प्रवेश दिनाच्या दिवशी मिळते ती घेण्याची नितांत गरज आहे वाचन हाच सक्षमतेचा मार्ग आहे.

जीवनाच्या विविध समस्या ज्ञानातून वाचनातून सोडवता येतात हा आत्मविश्वास डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय नागरिकांना दिला आहे ज्ञान ही सर्वश्रेष्ठ शक्ती आहे वाचन ही मुक्ती आहे वाचन आनंद आहे वाचन हा समाज निर्माणच्या कृतिशीलतेची बांधिलकी निर्माण करते.

राऊत आपल्या भाषणात पुढे म्हणाले की वर्तमान हे समस्याग्रस्त आहे अदृश्य शोषण समाजात सर्वत्र चालू आहे विषमता वाढते आहे बंधुभाव कमी होतो आहे हे सर्व होऊ द्यायचे नसेल तर आणि डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांना अभिप्रेत असलेला समताधिष्ठित समाज निर्माण करायचा असेल तर करूनेचा मैत्री मुदितेचा त्यांनी स्वीकारलेला तथागत गौतम बुद्धाचा प्रबुद्धतेचा मार्ग ज्ञानातूनच प्राप्त होतो हे विद्यार्थी जगतानी समजून घेण्याची गरज आहे सर्वधर्म मानव मुक्तीची भाषा बोलतात परंतु आंबेडकरांनी आपणाला संविधान हा मानवी हक्काच्या मुक्तीचा मार्ग दिला आहे तो अधिकार आपणास प्राप्त झाला आहे याची जाणीव ठेवून शाळा म्हणजे अध्ययन शाळा म्हणजे विचार शाळा म्हणजे चिकित्सा शाळा म्हणजे लेखन शाळा म्हणजे सतत प्रश्नांच्यासाठी ज्ञानाची अविरत वाटचाल करत राहणे हा विचार विद्यार्थी जगताने स्वीकारण्याची नितांत गरज आहे.

सुधारकांची चरित्रे नित्य वाचून त्यातून ज्ञानाचे महात्म्य प्रतीत होते इतिहास हा वाचनातून पुढे येतो इतिहासातून बंधुतेचा सद्भावनेचा शांततेचा विचार शिक्षण क्षेत्रामध्ये स्वीकारला पाहिजे तरच समाज निर्माणचा डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचा स्वप्नवाद साकारता येऊ शकतो असे सांगून शिवाजी राऊत म्हणाले की भारतीय समाज भौतिक तिकडे जितका झुकतो त्याहीपेक्षा ज्ञानाच्या साधनेत नवन्या निर्माणच्या प्रयत्नात तो व्यस्त राहिला पाहिजे हे शालेय जीवनातूनच रुजवता येते ते रुजवले गेले तरच नवी पिढी तंत्र कुशल ज्ञानवान व सामर्थ्यवान घडवता येते हे शिक्षण क्षेत्रातील अध्यापकांनी समजावून घेण्याची गरज आहे शेवटी राऊत म्हणाले की कौशल् व ज्ञान हे वर्तमानाच्या जगण्यासाठी आत्मसात करण्याची गुण आहेत याशिवाय वर्तमानातील समस्या सुटणार नाहीत त्यासाठी डॉक्टर आंबेडकरांनी दाखवलेला ज्ञानाचा मार्ग हा श्रद्धा आणि अभिवादन इतपत सीमित न होता तो जीवनाचा आचरणाचा सर्वांचा प्रयत्न व्हायला हवा हीच अपेक्षा शाळा प्रवेश दिनाच्या निमित्ताने उपस्थित विद्यार्थ्यांच्या कडून राऊ त यांनी बाळगली व विनंतीही केली

प्राचार्य संजय मांगलेकर आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हणाले की डॉक्टर आंबेडकर हे विश्व मानव आहेत त्यांची जीवन साधना म्हणजे अखंड ज्ञानाचा सागर आहे त्यापैकी वाचन हा त्यांचा गुण शाला प्रवेश दिनाच्या महात्म्यातून समजावून घेऊन आजच्या विद्यार्थ्यांनी वाटचाल करण्याची गरज आहे त्यासाठीच या कार्यक्रमाच्या आयोजन केले आहे असे त्यांनी कथन केले

आयटीआय मधील विद्यार्थी व शिक्षकांना व्याख्याते राऊत यांनी कॉलम ऑफ थॉट हे पुस्तक याप्रसंगी सस्नेह भेट दिले लिपिक अरुण पोळ... यांनी शाला प्रवेश दिन हा महाराष्ट्रभर साजरा होतो त्याचा इतिहास व त्याचे महत्त्व याप्रसंगी त्यांनी कथन केले कार्यक्रमाचे प्रास्ताविक व्याख्यातांचा परिचय सूत्र संचालन शिल्प निर्देशक विजय कुमार शिंदे ..... यांनी केले तर कार्यक्रमाच्या शेवटी स श्रीमती रेखाकुवरी...... यांनी उपस्थित यांचे आभार मानले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

## थोडक्यात...

### कांदा, लसूण महागले तर कापूस, सोयाबीनचे दर पडल्याने नाराजी

मुंबई, अमरावती : लोकसभा निवडणूक काळात कापूस, सोयाबीनला हमीभावापेक्षा कमी दर मिळाल्याने शेतकऱ्यांमधील रोषाचा फटका अनेक ठिकाणी महायुतीला बसला. तो यावेळी टाळण्यासाठी राज्य सरकारने काही उपाययोजना केल्या, पण शेतकऱ्यांना दिलासा मिळू शकलेला नाही. दुसरीकडे, कांद्याचा भाव किरकोळ बाजारात किलोला ८० रुपये तर लसूण ४०० रुपयांवर गेल्याने ग्राहकांवरील बोजा वाढला आहे. ऐन निवडणुकीच्या तोंडावर जीवनावश्यक अशा कांद्याचे दर वाढणे आणि कापूस व सोयाबीनला हमीभावापेक्षा कमी दर मिळणे हे सत्ताधारी महायुतीसाठी डोकेदुखी ठरू शकते. कांद्याचे भाव आणखी महिनाभर चढे राहण्याची शक्यता वर्तविली जाते. कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये कांदा आणि लसणाची आवक कमी झाल्यामुळे तुटवडा जाणवत आहे. दिवाळीनिमित्त नाशिक परिसरात कांद्याची खरेदी - विक्री आठवडाभर बंद होती. त्यामुळे बाजारात काद्यांचा तुटवडा निर्माण झाला आहे. शेतकऱ्यांकडील उन्हाळी कांदा जवळपास संपला आहे. खरीप कांद्याची काढणी सुरू असतानाच जोरदार पाऊस झाल्यामुळे कांदा सडला आहे. त्यामुळे खरीप कांद्याच्या उत्पादनात मोठी घट झाली आहे. कांद्याचे दर आणखी महिनाभर तर लसणाचे दर तीन महिने तरी चढे राहण्याची शक्यता वर्तविली जाते.

# विकास कामासाठी पुन्हा एकदा सचिन कल्याण शेट्टी यांना निवडून द्या

## अविनाश मडीखांबे यांचे प्रतिपादन; वागदरी गावात प्रचार बैठकीला ग्रामस्थांची गर्दी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/प्रतिनीधी : विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अक्कलकोट विधानसभा मतदारसंघातील वागदरी या गावात प्रचारार्थ बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. राज्यात पुन्हा एकदा भाजप महायुतीचे सरकार आणण्यासाठी कमळ या चिन्हासमोरील बटन दाबून भाजप महायुतीला प्रचंड मताधिक्याने विजयी करण्याचे आवाहन नागरिकांना आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी केले.



गेल्या पाच वर्षात वागदरी गावात हिंदु स्मशानभुमी ते मुसलिम स्मशानभुमी पर्यत सिमेंट रस्ता करणे, वार्ड क्र.४ मध्ये अंतर्गत सिमेंट रस्ता व बंदिस्त गटार करणे, कु. विशाल शिवाजी सावंत यांना वैद्यकीय मदत, जि.प.शाळा मराठी मुले दुरूस्ती करणे, चंद्राम खांडेकर घर ते चौडेश्वरी मंदिर पर्यंत सिमेंट रस्ता करणे, बोरगांव दे. रोड ते मुस्लिम स्मशानभुमीपर्यत रस्ता करणे, वार्ड क्र.३ मध्ये सिमेंट कॉक्रिट रस्ता व बंदिस्त गटार करणे, घाळीदास मंदिरासमोर सभामंडप बांधणे, शशिकांत कलाल घर ते सुलेमान नदाफ घरापर्यत सिमेंट रस्ता करणे, हरिजन वस्ती येथे सिमेंट रस्ता करणे ही विकासकामे केली आहेत. तसेच राजकुमार दुधगी घर ते सन्मुख भावी घरापर्यत, सिमेंट रस्ता करण, हनुमान मंदिर ते अमबाबाई मंदिरपर्यत सिमेंट रस्ता, वडार समाज येथे सभागृह बांधणे, जलसंधारण अंतर्गत पाझर तलाव क्र. १, जलसंधारण अंतर्गत पाझर तलाव क्र. २, जलजीवन मिशन योजना अंतर्गत पाणी पुरवठा सोय, भुरीकवठे बॉर्डर ते वागदरी आणि अक्कलकोट ते अक्कलकोट स्टेशन रस्ता, किणी ते पालापूर-बोरगांव दे.- वागदरी रस्ता, हन्नर-किणी-बोरगांव दे.- वागदरी राज्य हद्द रस्ता, रा.मा.२११ ते गोगाव-खैराट-भुरीकवठे-किरनळ्ळी रस्ता, जि.प. कन्नड शाळा दुरूस्ती करणे, परमेश्वर मंदिर येथे सभामंडप बांधणे ही कामे झाली आहेत. याशिवाय बसवेश्वर गल्ली येथ सिमेंट रस्ता करणे, गावांतर्गत सिमेंट रस्ता करणे, वार्ड क्र. ०४ मध्ये अंतर्गत सिमेंट रस्ता करणे, तलाठी कार्यालय ते हनमान मंदिरापर्यत सिमेंट रस्ता करण, वार्ड क्र. २ मध्ये सिमेंट रस्ता करणे, तोल्यामुख दर्गा ते अंबाबाई मंदिर पर्यत सिमेंट रस्ता, आण्णासाहेब साठे नगर येथे बंदिस्त गटार करणे, वार्ड क्र. २ मध्ये अंतर्गत सिमेंट रस्ता करणे, नंदर्गी गुरूजी घर ते सुभाष धडे घरापर्यत गटार करणे, मुस्लिम समाज कब्रस्तान वॉल कंपाउंड, मांतग वस्ती येथे सभामंडप बांधणे, मल्लम्मा ठोंबरे घर ते महावीर शहा शेतापर्यंत पाणंद रस्ता या कामांना मंजुरी देण्यात आली आहे. असे बोलताना सांगितले

यावेळी बोलताना अविनाश मडीखांबे म्हणाले की काँगेस वाले फक्त जाती जाती मध्ये भांडण लावायचे काम करीत आहे आमदार सचिन कल्याण शेट्टी हे दलित मुस्लिम विरोध असल्याचे वातावरण निर्माण करीत असून यांना कधीही भिक घालणार आपले समाज नाही दलित मुस्लिम समाज जागृत झालेले असून खरे जातीवादी कोण आहेत त्यांना माहिती आहे आज तालुक्यात दलित वस्ती मुस्लिम समाजासाठी कोट्यवधी निधी दादाने आणून सामाजिक विकास करण्याचे काम करीत आहेत तालुक्याची विकास करण्यासाठी दादांना पुन्हा एकदा प्रचंड मतांनी विजय करण्याची आवाहन रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गटाचे तालुकाध्यक्ष अविनाश मडीखांबे यांनी केले

यावेळी श्री. संजय देशमुख, श्री. दिलीप सिद्धे, श्री. अविनाश मडीखांबे, श्री. शिवराज स्वामी, श्री. मल्लिनाथ स्वामी, श्री. श्रीशैल ठोंबरे, श्री. आनंद तानवडे, श्री. अप्पू बिराजदार, श्री. महेश हिंदोळे, श्री. राजेंद्र बंदीछोडे, श्री. शरणप्पा मंगणे, श्री. धोंडप्पा यमाजी, श्री. सागर कल्याणशेट्टी, श्री. अमोल हिप्पर्गी, श्री. सिद्धेश्वर मठपती, श्री. प्रदीप जगताप, श्री. कमलाकर सोनकांबळे, श्री. लक्ष्मण भैरमडगी, श्री. सिद्धरुढ नंदर्गी, श्री. रेवप्पा यमाजी, श्री. मुल्ला गुरुजी, श्री. बसवराज शेळके, श्री. प्रदीप पाटील, श्री. सतीश कणमुसे, श्री. कल्लप्पा बिराजदार, श्री. अभिमन्यू कणसे, श्री. सुनील सावंत, श्री. प्रकाश पोमाजी, श्री. संतोष पोमाजी, सौ. लक्ष्मीबाई पोमाजी, सौ. जयश्री बटगेरी, भाजप-महायुतीचे पदाधिकारी कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# काँग्रेसचे अनेक नेते व शहराध्यक्ष व पदाधिकाऱ्यांचा अनिल सावंत यांना पाठिंबा; भगीरथ भालके यांना धक्का

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी

पंढरपूर विधानसभा मतदारसंघातून महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार अनिल सावंत यांना काँग्रेसचा शहराध्यक्ष अनेक पदाधिकाऱ्यांचा पाठिंबा.

पंढरपूर मंगळवेढ्यात काँग्रेसमध्ये फूट, भगीरथ भालकेवर नाराज होत काँग्रेसचे पदाधिकाऱ्यांचा अनिल सावंतांना पाठिंबा.



पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदारसंघात यंदा चौरंगी लढत पाहायला मिळणार आहे भाजपकडून समाधान आवताडे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार यांच्याकडून अनिल सावंत काँग्रेसकडून भगीरथ भालके हे चार उमेदवार रिंगणात आहेत. काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार या दोन्ही पक्षांनी आपापली उमेदवार रिंगणात उतरवले आहेत.

काँग्रेसने घेतलेले या निर्णयामुळे तालुक्यातील काँग्रेसचे पदाधिकारी नाराज झाले आहेत काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी नाराजी होऊन आज पत्रकार परिषद घेऊन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्रजी पवार पक्षाचे उमेदवार अनिल सावंत यांना जाहीर पाठिंबा दिला आहे.

आज शनिवार दिनांक ९ नोव्हेंबरला विठ्ठल इन कार्यालयात स्टेशन रोड पंढरपूर या ठिकाणी पत्रकार परिषद घेऊन हा निर्णय घेतला गेला आहे.

काँग्रेस पक्षाचे पंढरपूर शहराध्यक्ष अमर सूर्यवंशी पंढरपूर युवक काँग्रेस शहराध्यक्ष संदीप शिंदे, सेवादल शहराध्यक्ष गणेश माने, व्ही जी एन टी शहराध्यक्ष गोकुळ माने सोशल इंडिया अध्यक्ष महेश दादाराव यांचे जिल्हा सचिव पांडुरंग डांगे काँग्रेसचे विधानसभा युवक अध्यक्ष सोमनाथ आरे, काँग्रेसचे शहर उपाध्यक्ष सागर कदम, शैलेश घोगरदारे, अशुभान शिंदे, काँग्रेस सरचिटणीस पिंटू जाधव, शहर सचिव अनिल माने, शहर सचिव संसुदीप पवार, स्वर उपाध्यक्ष नागनाथ आदटराव, किशोर महाराज जाधव, आधी काँग्रेसचे पदाधिकारी आणि शेकडो कार्यकर्त्यांनी अनिल सावंत यांना जाहीर पाठिंबा दिला.

शहराध्यक्ष अमर सूर्यवंशी पत्रकार परिषद माध्यमांशी बोलताना म्हणाले की यापूर्वी पंढरपूर मंगळवार विधानसभेची निवडणूक केवळ पाणी प्रश्न आणि रस्त्याच्या समस्यावर लढवली गेली पण यावेळी पहिल्यांदाच अनिल सावंत यांनी मतदारसंघात यापुढे जाऊन शिक्षण संस्था रोजगाराची मुख्य केंद्र उभारण्याचा विचार मांडला आहे त्यामुळे आम्हाला अनिल सावंत यांचे विचार पटलेली विकासाबाबतची त्यांची दडपण आम्हाला बाहुली आहे आणि म्हणून सर्व पदाधिकारी कार्यकर्त्यांनी एकत्रित येऊन सावंत यांना जाहीर पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला .

याबरोबर काँग्रेसने दिलेल्या उमेदवारीला आम्हाला पसंत नाही व काँग्रेसचा उमेदवार आम्हाला विचारात नाही विश्वास घेत नाही प्रणिती शिंदे आमच्या नेते आहेत मात्र आमच्या निर्णय झालेला आहे आता माघार घेण्याचे कोणताही प्रश्न नाही.

राष्ट्रवादी काँग्रेसचे शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार अनिल सावंत यांनी पंढरपूर शहराध्यक्ष अमर सूर्यवंशी आणि पाठिंबा देणाऱ्या काँग्रेसच्या विविध पदाधिकाऱ्यांचे कार्यकर्त्यांचे आभार मानले,

माध्यमाशी बोलताना अनिल चव्हाण म्हणाले की पंढरपूर मंगळवेढा या राष्ट्रवादीच्या पारंपरिक मतदारसंघ आहे काल जयंत पाटील यांनी देखील अनिल सावंत यांचे महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार असल्याचे स्पष्ट केले आहे या मतदारसंघात कोणाची किती ताकद आहे हा प्रश्न नाही आम्ही महाविकास आघाडी म्हणून एकत्रित लढून ही जागा निश्चितपणे जिंकू असे आत्मविश्वासाने त्यांनी सांगितले.

# एकवीस वर्षांनी भरली आठवणींची शाळा

## लोणवाडी येथे माजी विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : दावचवाडी येथील योगेश्वर विद्यालयातील सन २००३ मध्ये दहावीत शिकत असणारे विद्यार्थी ६ नोव्हेंबरला तब्बल २१ वर्षांच्या प्रदीर्घ काळानंतर हॉटेल माखनलाल येथे पुन्हा एकत्र आले. सर्व उपस्तीत असणाऱ्या सर्व माजी विद्यार्थ्यांनी पुन्हा एकदा आपल्या आठवणींना उजळा दिला. माजी विद्यार्थ्यांनी स्वतःचा परिचय करून देत त्यांच्या सध्याच्या आयुष्याची सुद्धा ओळख करून दिली आणि आयुष्यातील आलेले काही महत्त्वाचे अनुभव देखील या वेळी मांडले. त्यांच्या या मांडलेल्या विचारांनी सर्वजण भारावून गेले. नंतर संगीत खुर्ची, बास्केटबॉल आणि प्रश्नमंजुषा असे खेळ घेतले. आणि विजेत्यांना बक्षीस वाटप करण्यात आले. नंतर सर्वांनी रुचकर भोजनाचा लाभ घेतला. शेवटी सर्वांना आठवण म्हणून रोपे वाटप करण्यात अली. या कार्यक्रमाचे नियोजन प्रशांत ताकाटे, अरुण कुयटे, विक्रम साळवे, सविता कुयटे, धीरज आहेर यांनी केले आणि सर्वांनी याला उत्स्फूर्तपणे प्रतिसाद दिला. तसेच कारसुळ येथील पीएसआय प्रशांत ताकटे यांनीही व्हिडिओ कॉल वरती आपली उपस्थिती नोंदवली.



# डॉ.सुजय विखे पाटील यांनी लोणी खु, मापारवाडी व परिसरातील विविध गावांमध्ये जाऊन मतदारांशी संवाद साधला

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

शिर्डी/प्रतिनिधी : घराघरात भेट देत त्यांनी मतदारांच्या समस्या समजून घेत त्या सोडवण्यासाठी पक्षाच्या योजना, विकास धोरणे व पुढील संकल्पना उलगडून सांगतानाच कमळ या चिन्हासमोरील बटण दाबून राधाकृष्ण विखे पाटील यांना मोठ्या मताधिक्याने विजयी करण्याचे आवाहन त्यांनी केले.



महायुतीच्या प्रचाराला मतदारांचा उत्कृष्ठ प्रतिसाद मिळत असून, महायुती सरकारच्या योजनांमुळे लाभार्थींही आता महायुतीला मतदान करणार असा विश्वास व्यक्त करताना दिसत आहेत. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा मिळालेला लाभ याचा उत्साहही महिला मतदारांमध्ये ठळकपणे दिसून येतो. त्यामुळे महिलांची सक्रीयता प्रचारात ठिकठिकाणी पाहायला मिळत आहे.

लोणी खुर्द गावातील दौऱ्यात डॉ.सुजय विखे पाटील यांच्यासोबत स्थानिक नेते, पदाधिकारी व असंख्य कार्यकर्त्यांचे उपस्थित होते. मतदारांना पक्षाच्या भूमिका, राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अनुभव संपन्न नेतृत्वाखालील विकास कामांची हमी आणि भविष्यातील विकास कामांच्या प्रक्रीयेची माहीती त्यांनी संवादातून मतदारांना दिली. विविध गावांमध्ये ग्रामस्थांनी डॉ. विखे पाटील यांचे जल्लोषात स्वागत केले व पक्षाला संपूर्ण पाठिंबा आश्वासित केले.

**उत्पादन शुल्क विभागाची धडक कारवाई**

**अधीक्षक भाग्यश्री जाधव यांची माहिती**

# उत्पादन शुल्क विभागाच्या कारवाईत १२ वाहनांसह १५ लाख ६३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (जिमाका) : आचार संहिता कालावधीमध्ये राज्य उत्पादन शुल्क विभागाने, सोलापूर यांनी केलेल्या धडक कारवाईमध्ये एक दिवसामध्ये अवैध बनावट देशी विदेशी मद्य वाहतुक करणारे एका दिवसात पकडली बारा वाहने, १५ लाख ६३ हजार ३१३ रूपयांचा मुद्देमाल जप्त. तसेच ढाब्यांवर पिणा-यांना २ लाखाचा दंड करण्यात आला.





विधानसभा निवडणूक २०२४ पार्श्वभुमीवर राज्य उत्पादन शुल्क विभाग सोलापूर यांची विभागीय उपायुक्त पुणे विभाग सागर धोमकर याच्या निर्देशानुसार , अधीक्षक राज्य उत्पादन शुल्क सोलापूर श्रीमती भाग्यश्री पं. जाधव, उपअधीक्षक राज्य उत्पादन शुल्क सोलापूर एस आर पाटील याचे मार्गदर्शनाखाली दि. ७ नोव्हेंबर २०२४ रोजी सोलापूर शहर व जिल्हयामध्ये केलेल्या कारवाईत १५ गुन्हें नोंद करण्यात आले असून १३ व्यक्तींवर कारवाई करण्यात आली असून सदर कारवाईत २७०० लि. गुळमिश्रीत रसायन, ५९३ लि. हातभटटी दारु, २६.२५ ब.लि. देशी मदय, ८४.९६ विदेशी मदय, १५.६ ब.लि बिअर तसेच ७७.७६ ब.लि बनावट विदेशी मदय जप्त करण्यात आले असून बारा वाहने जप्त करण्यात आली असून त्यामध्ये एक चारचाकी वाहन, एक अॅटोरिक्षा व दहा मोटार सायकल सह एकुण रू १५,६३,३१३/- चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

हि कारवाई निरीक्षक आर. एम. चवरे, जे. एन पाटील, ओ व्ही घाटगे, डी. एम बामणे ,पंकज कुंभार, भवड, मारुती मोहीते तसेच दुय्यम निरीक्षक, आर एम कोलते, धनाजी पोवार, समाधान शेळके, सुखदेव सिद, श्रीमती अंजली सरवदे, कुदळे, श्रीमती बहुधाने सहाय्यक दुय्यम निरीक्षक मुकेश चव्हाण, मोहन जाधव, संजय चव्हाण, विजय पवार, गुरुदत्त भंडारी, आनंद जोशी, जवान सर्वश्री आण्णा करचे, नंदकुमार वेळापूरे, शोएब बेगमपुरे, वसंत राठोड, चेतन व्हनंगुटी, इसमाईल गोडीकट, कपील स्वामी, दिनकर शिंदे, अनिल पांढरे, विनायक काळे, विकास वडमिले, विजय शेळके, योगीरज तोग्गी, तानाजी जाधव, वाहनचालक रशीद शेख व दिपक वाघमारे यांनी पार पाडली.

आचारसंहिता कालावधीमध्ये दि. १५ ऑक्टोबर २०२४ ते ते दि.८ नोव्हेंबर २०२४ या कालावधीमध्ये सोलापूर शहर व जिल्ह्यात एकुण १८५ गुन्हे नोद करण्यात आले आहे. सदर कालावधीत ४२ वाहनासह एकुण १,००,३०,९४६/- इतका मुददेमाल जप्त करण्यात आला आहे. अवैध विनापरवाना मद्य पिण्यास परवानगी देणा-या सहा (हॉटेल सावजी, जोडभावी पेठ व हॉटेल जयभवानी, सलगरवस्ती, हॉटेल दुर्गा, होटगी रोड, हॉटेल मातोश्री, होटगी रोड, हॉटेल सावजी कोल्ड्रीक्स कन्ना चौक, ढाब्यांवरती कारवाई करुन ब्रीथ् अॅनलायझर चा वापर करुन वैदयकीय चाचणी नंतर सहा ढाबा मालक व मद्यपी ग्राहकांना मा. न्यायालायासमोर हजर केले असता ढाबा मालकास प्रत्येकी रुपये २५ हजार व मद्यपी ग्राहकांना प्रत्येकी रुपये ३ हजार इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा सुनावण्यात आली असून एकुण रु.२ लाख ४ हजार इतक दंड जमा करुन घेण्यात आला आहे. तसेच अशा प्रकारे अवैध ढाब्यांवर कारवाई यापुढे अशीच चालू राहणार आहे. परवाना नसणा-या ठिकाणी मद्य प्राशन केल्याने संबंधित जागा मालक व मद्यपी या दोघांवर कारवाई होऊ शकते याची नोंद संबंधितानी घ्यावी.

अवैध मद्यविक्री, अवैध धंदे व वाहतूकी विरोधात कारवाई या पुढेही चालु राहणार असून अवैध मद्याबाबत माहिती असल्यास टोल फ्री १८००२३३९९९९ क्रमांक अथवा व्हॉटस अॅप क्रमांक ८४२२००११३३ यावर कार्यालयास माहिती दिल्यास माहिती देणा-याचे नाव गुप्त ठेवले जाईल असे अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क. श्रीमती भाग्यश्री पं. जाधव, सोलापुर यांनी सांगुन अवैध मद्याबाबतची माहिती कळविण्याचे आवाहन केले आहे.

**थोडक्यात...**



### सोलापूर शहर मध्य मधून प्रदीप सर्जन हे अपक्ष म्हणून आव्हान देणार

सोलापूर (प्रतिनीधी ) : सोलापूर शहर मध्य हा तसा आधीपासून चर्चित मतदासंघांपैकी एक असून या मतदारसंघात अटीतटीची लढत होणार हे निश्चित असून या मतदार संघात पहिल्यांदाच अक्कलकोटचे सुपुत्र प्रदीप सर्जन हे अपक्ष निवडणूक लढवत असून मित्रपरिवार गेल्या दोन वर्षापासून मतदार यांच्यामध्ये संपर्क यामुळे ते चांगली टक्कर देतील असे बोलले जात आहे त्यांचा उमेदवारी अर्ज सुद्धा वैद्य ठरला असून त्यांना अंगठी हे चिन्ह मिळाले आहे आता प्रदीप सर्जन कसी लढत देतात हे पाहणे आहे

# माढ्याच्या विकासाचे व्हिजन असणाऱ्या अभिजीत पाटील यांना मतदारांची साथ

## अनेकांनी केला पक्षप्रवेश : अभिजीत पाटलाची ताकद वाढली; सरपंच, विकास सोसायटीच्या चेअरमननी दिली साथ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर /प्रतिनिधी

माढा विधानसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार अभिजीत पाटील यांच्या प्रचारार्थ शुक्रवारी परीते,अकोले बु आहेरगाव, भुईंज, पालवन, अंकुबी, भटुंबरे, नारायण चिंचोली, ईश्वर वठार या ठिकाणी सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी महाविकास आघाडीतील सर्व घटक पक्षाचे प्रमुख पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना अभिजीत पाटील म्हणाले की ही निवडणूक कारखान्याची नसून विधानसभेची आहे. विद्यमान आमदारांनी ऊस आणि पाण्यावरच राजकारण केले. यामुळे तब्बल सहा वेळा प्रतिनिधित्व करूनही तीस वर्षात कोणतीही विकास



कामे झाली नाही असा आरोप करत त्यांनी मतदारसंघातील रस्त्याची दुरावस्था झाली आहे. बसस्थानकाची दुरावस्था झाली आहे. दर्जेदार आरोग्य सेवा नाही. उच्च शिक्षणाची सोय नाही. बेरोजगारी वाढली आहे. नोकरीसाठी येथील तरुणांना बाहेरगावी जावी लागत आहे. असा सवाल उपस्थित करत त्यांनी माढ्याच्या विकासाचे व्हिजन नागरिकांसमोर मांडले.

याप्रसंगी राष्ट्रवादीच्या मीनल साठे गटाचे जाधववाडी विविध सोसायटीचे चेअरमन शिवाजी भाकरे, शिवाजीराजे कांबळे गटाचे संतोष वामन मुटकुळे, राजाभाऊ सलगर व तसेच सोलंकरवाडीचे सरपंच बाबासाहेब पांढरे, यांनी अभिजीत पाटील यांच्या कार्यावर व कर्तुत्वावर विश्वास ठेवत येणाऱ्या काळामध्ये साथ देण्यासाठी विजय करण्यासाठी साथ देण्याची ठरवले आहे. त्यामुळे आम्ही अभिजीत पाटील यांची ताकद मोठ्या प्रमाणात वाढली असल्याचे दिसत आहे.

यावेळी अनेक वक्त्यांनी बोलताना सांगितले की माढ्याच्या विकासाचे व्हिजन डोळ्यासमोर ठेवून काम करणारे अभिजीत पाटील यांना मतदार संघाच्या सर्वांगीण विकास करण्यासाठी आपला मतदानरुपी आशीर्वाद देऊन विधानसभेत पाठवले पाहिजे असा निर्धार करण्यात आला.

कोणतीही राजकीय पार्श्वभूमी नसताना सर्वसामान्य कुटुंबातील युवक पुढे येऊन श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याची धुरा यशस्वीपणे सांभाळताना आता मतदारांनीच अभिजीत पाटलांना आमदार करावासे वाटत आहे. माढ्याचे विकासाचे व्हिजन डोळ्यासमोर ठेवून तीस वर्षात न केलेला विकास तो पाच वर्षात भरून काढण्याची धमक अभिजीत पाटलांमध्ये दिसत असल्यामुळे नागरिकांचा कौल हा अभिजीत पाटलांच्या मागे सरताना दिसत आहे.

# 'सिद्धी शुगर'चा गळीत हंगाम २०२४-२०२५ चा गळीत हंगाम मुहूर्त कार्यक्रम



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

लोहा/प्रतिनिधी : सिद्धी शुगर अँड अलाईड इंडस्ट्रीजचा १३ वा गळीत हंगाम शुभारंभाचा कार्यक्रम शनिवार दिनांक ०९.११.२०२४ रोजी सकाळी ठीक ११:०० वाजता दुर्गाष्टमीच्या शुभ मुहूर्तावर कारखान्याने व्हाईस प्रेसिडेंट श्री. पी.जी. होनराव, जनरल मॅनेजर श्री. एस. आर. पिसाळ, जनरल मॅनेजर (टेक) श्री. बी.के. कावलगुडेकर, जनरल मॅनेजर (केन) श्री. पी. एल. मिटकर, जनरल मॅनेजर (डिस्टिलरी) श्री. एस. बी. शिंदे तसेच सर्व खाते प्रमुख उपखाते प्रमुख व कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत संपन्न झाला

त्यापूर्वी कारखान्याची चीफ अकाउंटंट श्री. एल. आर. पाटील व त्यांच्या सुविद्ध पत्नी यांच्या हस्ते सहपत्नी सत्यनारायण पूजा संपन्न झाली.

याप्रसंगी कारखान्याचे व्हाईस प्रेसिडेंट म्हणाले की सीजन २०२३- २४ मध्ये शेतकऱ्यांना योग्य असा ऊस दर दिला असून शेतकरी व सभासदांच्या हितचिंतनाने कारखाना मागील बारा वर्षापासून उत्कृष्टरित्या चालला. पुढील काळातही शेतकऱ्यांच्या मदतीने एक आदर्श कारखाना बनणार आहे. सिद्धी शुगर कारखान्यामुळे अहमदपूर, चाकूर, जळकोट, लोहा, कंधार, पालम व गंगाखेड तालुक्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे दरडोई उत्पन्न वाढले असून त्यांच्या जीवनामध्ये आर्थिक संपन्नता प्राप्त झाली आहे. कारखान्याच्या उत्तम नियोजनामुळे परिसरातील ऊस उत्पादकांचा विश्वास सिद्धी शुगर ने संपादन केला आहे.

सदर कार्यक्रमात मार्गदर्शन करताना कारखान्याचे जनरल मॅनेजर केन श्री मिटकर म्हणाले की हंगाम २०२४-२५ मध्ये कारखान्याचा शेतकी विभाग व सर्वांनी मिळून प्रयत्न करून जास्तीत जास्त ऊस गाळप करण्याचे नियोजन करावे. यावर्षी जिल्ह्यात व कार्यक्षेत्रात चांगल्या प्रमाणात पाऊस झाल्यामुळे चांगल्या प्रतीचे बेणे वापर करणेस व बेणे प्रक्रिया व यापुढे मशीनद्वारे ऊस तोडला जाणार असल्यामुळे उसाची लागवड ५ फूट सरीवर करावी असे सांगितले.

यावेळी कारखान्याचे चीफ फायनान्स ऑफिसर श्री ए. एस. पाटील, ऊस विकास अधिकारी श्री वाय. आर. टाळे ऊस पुरवठा अधिकारी श्री व्हि. के.येदले डे.चिप इंजिनियर श्री. मुलानी, इन्स्ट्रुमेंट मॅनेजर श्री. लोखंडे डेप्युटी चीफ केमिस्ट श्री. लकडे परचेस ऑफिसर श्री धनराज चव्हाण, ई.डी.पी. मॅनेजर श्री प्रशांत जाधव, सिव्हिल इंजिनिअर श्री. साळुंखे, स्टोअर कीपर श्री. स्वामी, सुरक्षा अधिकारी श्री. डोंगरे, हे टाईम कीपर श्री. धनंजय टिळक, आदी सह कारखान्याचे इतर सर्व अधिकारी, कर्मचारी व कामगार बांधव व तसेच कंत्राटदार उपस्थित होते

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कारखान्याचे ऊस विकास अधिकारी श्री. टाळे यांनी केले व तसेच आभार कारखान्याचे जनरल मॅनेजर श्री. पिसाळ यांनी मानले.

# महा विकास आघाडीची उमेदवार अनिल सावंत यांना वसंत नाना देशमुख यांचा तुतारीला पाठिंबा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार अनिल सावंत यांना माजी जिल्हा परिषद सदस्य वसंत नाना देशमुख यांनी पाठिंबा दिला आहे.

खासदार दैलेशीर मोहिते पाटील यांनी शिष्टाई केली आहे पंढरपूर मंगळवेढ काँग्रेसची मोठी कार्यकारिणी अनिल सावंत यांना पाठिंबा दिला आहे काँग्रेसचे उमेदवार भगीरथ भालके यांना मोठा धक्का दिला आहे. श्री वसंत नाना देशमुख यांनी शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस कडून उमेदवारी मागितली होती व निवडणूक लढवण्यास इच्छुक होते. खासदार शरदचंद्र पवार यांचे भेट घेऊन त्यांनी निवडणूक लढवण्याची आपली इच्छा व्यक्त केली होती वसंतराव देशमुख यांना जिल्हा परिषद काशिगाव गट व पंढरपूर तालुका मोठ्या प्रमाणात त्यांना मानत आहे.

त्यांनी आपली काशिगाव सह पंढरपूर तालुक्यातील सर्व ताकद पंढरपूर मंगळवेढा विधानसभेचे महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार अनिल सावंत यांच्या पाठीमागे उभे करणे ठरवले आहे त्यामुळे अनिल सावंत यांची मोठ्या प्रमाणात ताकद वाढली आहे.

# राणा जगजितसिंह पाटलांनी करीत आसलेल्या विकास कामांना गती देण्यासाठी व नळदुर्ग तालुका निर्मितीसाठी दादांना समर्थन दया : मल्हार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे : महाराष्ट्र राज्यात होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीच्या माध्यमातून तुळजापूर तालुका विधानसभा मतदारसंघात भाजपाचे अधिकृत उमेदवार राणा जगजितसिंह पाटील यांच्या प्रचारार्थ त्यांचे पुत्र मल्हार पाटील यांनी नळदुर्ग शहरात झंझावात दौरा काढला असून राणा दादांना नळदुर्ग शहरासाठी केलेल्या विकास काम व विकास कामांना गती देण्यासाठी नळदुर्ग या ऐतिहासिक नळदुर्ग शहराला नळदुर्ग तालुका निर्मितीसाठी मतदारांनी राणा दादाच्या डोक्यावर मायेचा हात ठेवावा आणि भरभरून आशीर्वाद द्यावा असे प्रतिपादन यूवा नेते मल्हार राणा जगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केले . नुकताच नळदुर्ग शहरांमध्ये प्राचाराचा नारळ वाढवून पदयात्रा काढण्यात आली.



ते पुढे म्हणाले राणा जगजितसिंह पाटील यांना नागरिकांनी पुन्हा आपली सेवा करण्याची संधी व समर्थन द्यावे जेने करून विकास कामाना गती मिळेल असे ही प्रतिपादन युवा नेते मल्हार पाटील यांनी केले आहे

तुळजापूर तालुक्याचे भाजपाचे अधिकृत उमेदवार राणा पाटील यांनी नळदुर्ग शहरांमध्ये केलेल्या विकासकाम आणि नागरिकांनी ज्या समस्या दादा समोर मांडल्या त्या समस्या दादांनी तात्काळ सोडविल्या आहेत पुढे नळदुर्ग साठी व तालुका निर्मितीच्या माध्यमातून आहे आपले बळ आपला आशीर्वाद दादाच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून दादांना भरभरून आशीर्वाद द्यावा आशी मतदाराना विनंती केली नळदुर्ग शहरात प्रचाराचा शुभारंभ करून पदयात्रा काढण्यात आली ही पदयात्रा लोकमान्य वाचनालय येथे गणरायाचे पूजन करून ही पदयात्रा काढण्यात आली यावेळी लोकमाता अहिल्याबाई होळकर चौक , शास्त्री चौक, ऐतिहासिक चावडी चौक , क्रांती चौक , ते पोलीस ठाणे किल्ला गेट साठे नगर, भीम नगर पर्यंत पदयात्रा काढून भीमनगर मध्ये नालंदा बुद्ध विहार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला वंदन करण्यात आले यावेळी गावातील भाजपाचे नेते सुशांतजी भूमकर

**नळदुर्ग शहरात मल्हार पाटलांचा झंजावात दौरा**

नय्यर जागीरदार, गणेश मुरडे, समन्वयक समितीचे प्रमुख रणजीतसिंह ठाकुर माजी नगरसेवक सुधीर हजारे , बंडू , निखील घोडके , शहर प्रमुख धिमाजी घुगे ., संजय विठ्ठल जाधव , बबन चौधरी , शिवाजी गायकवाड , पांडु पुदाले, निरंजन राठोड , छमाबाई राठोड सागर हजारे , रिपाईचे बाबासाहेब बनसोडे , दुर्वास बनसोडे योगेश बनसोडे , बापू दुरुगकर सह हजारो कार्यकर्ते उपस्थित होते .

**गावा-गावात उत्साहात स्वागत**

**भगीरथ भालके यांचे प्रतिपादन**

# सर्वसामान्य जनता माझ्याबरोबर आहे जनता मला मोठ्या मताधिक्याने विजयी करतील

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी

पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीचे काँग्रेसचे अधिकृत उमेदवार भगीरथ भालके यांच्या गव्हर्मेंट दौऱ्यात गावातील सर्वसामान्य नागरिक युवक युवती महिला शेतकरी वर्ग व्यापारी कै. भारत नाना भालके यांना स्वाभिमानी विचाराची जनता यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद दिसून येत आहे अनेक गावात त्यांचे उत्साहात स्वागत करण्यात आले आहे.

पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदारसंघातील महाविकास आघाडी काँग्रेसचे अधिकृत उमेदवार बजेट बालक यांच्या कॉर्बेट दौऱ्यात गावातील चौरसामेंट नागरी जनता त्यांच्याबरोबर आहे.

जनतेचे प्रतिनिधित्व असा असावा भगीरथ भालके यावेळी भगीरथ भालके आपली विचार व्यक्त करताना म्हणाली की मतदार संघातील स्वाभिमानी जनता योग्य स्वाभिमानी उमेदवारांचा आशीर्वाद



देऊन विजयी करतील सर्वसामान्य जनतेच्या मनातील उमेदवार असून विश्वासू निष्ठावंत कार्यकर्ता असून मला मोठ्या प्रमाणात मदत मताधिक्य देऊन मला विजयी करतील.

लोकप्रतिनिधी सत्ताधारी पक्षाचा असला तरी सरकारला जाब विचारणार असला पाहिजे पिक विमा, विज,अवकाळी नुकसान झालेल्या त्यांना न्याय देण्यासाठी विधानसभेत गेली पाहिजे व ते मात्र लोकप्रतिनिधी या प्रश्नावर गप्प राहिले त्यामुळे आता बदल घडवणे आवश्यक आहे असे आव्हान काँग्रेसचे उमेदवार भगीरथ भालके यांनी ब्रह्मपुरी तालुका मंगळवेढा येथे झालेल्या जाहीर सभेत केले.

सर्व सामान्यातला माणूस भगीरथ बालके हा दौऱ्यात काँग्रेस तालुका अध्यक्ष प्रशांत चाळीस समाधान पाटील अँड राहुल घुले मारुती वाकडे पांडुरंग चौगुले अँड अर्जुन पाटील भारत बेंद्रे दयानंद सोनगे अँड रविकिरण कोळेकर मनोज माळी या अभिमन्यू बेंद्रे सिद्धेश्वर धसाडे सत्तार इनामदार महादेव फराटे नितीन पाटील गुलाब थोरबोले यांच्यासह नागरिक उपस्थित होते

पुढे बोलताना भगीरथ भालके म्हणाले की दामाजी कारखाना चुकीचे काम करणारा माणूस बदलण्यासाठी समविचारी आघाडी स्थापन करण्यात आली आता तोच माणूस बदलण्यासाठी मी लढतोय तुम्ही माझा सोबत या.

महाविकास आघाडी व काँग्रेस पक्षाचे अधिकृत उमेदवार भगीरथ भालके यांना बोराडे तालुका मंगळवेढा येथील ग्रामस्थांच्या वतीने विधानसभा निवडणुकीत ९, ९९९ रुपये देणगी म्हणून देण्यात आली

दौरा दरम्यान मुंडेवाडी कामगार डी दंडोर सिद्धापूर आरळी नंदुर डोनर बोराळे या गावांमध्ये जनतेसमोर भगीरथ भालके यांनी आपली काँग्रेस पक्षाची भूमिका मांडली यावेळी मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

# अभिजीत पाटील यांची माढा मतदार संघात महिलांनी सुरू केला प्रचार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/पंढरपूर : माढा विधानसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार अभिजीत पाटील यांच्या प्रचारात आता महिलांनी प्रचार यंत्रणा सुरू केली आहे. स्वतः पाटील यांची एक टीम, शिवतेजसिंह मोहिते-पाटील यांची एक टीम तर आनंद पाटील, अमर पाटील यांची टीम आणि महिला वर्गाची एक टीम करून मतदार संघातील वेगवेगळ्या भागातील गावभेट दौऱ्यातून तीनही टीम विकासकामांसाठी मते मागताना दिसत आहेत. श्री.पाटील यांनी काल माढा तालुक्यातील बावी, भुताष्टे, विठ्ठलवाडी, लोंढेवाडी, चिंचोली, खैरेवाडी, महातपूर, राहुल नगर, निमगाव या गावांचा प्रचार दौरा केला. या सर्वच ठिकाणी त्यांना स्थानिक नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. त्यानंतर सायंकाळी वडशिंगे व दारफळ येथे जाहीर सभा घेतल्या. यावेळी त्यांनी मागील तीस वर्षांपासून आमदारकी हातात असतानाही माढा विधानसभा मतदारसंघात रस्ते, पाणी, वीज, आरोग्य, शिक्षण या मूलभूत सुविधांचीही पूर्तता झालेली नाही असे सांगून विकासकामांसाठी निवडून देण्याचे आवाहन केले. याशिवाय साखर कारखानदारीचे राजकारण वेगळे आणि विधानसभेचे वेगळे असे सांगून त्यांनी विकासकामांचे विषय घेऊन निवडणुकीला सामोरे गेले पाहिजे असे ते म्हणाले.



**महिलांचा गृहभेटीवर भर तर पाटील आणि शिवतेजसिंह मोहिते पाटील यांचे गावभेट दौरे सुरू**

दुसरीकडे सुमित्रा अभिजीत पाटील व रश्मी अमर पाटील यांनी गावोगावी महिला कार्यकर्त्यांना सोबत घेऊन देगाव, अजनसोंड, शेगाव, उंबरे, कान्हापुरी, देवडे, जळोली, खेडभोसे, उपळाई, माढा शहर, यांसह अनेक गावांमध्ये घरोघरी जाऊन प्रचार केला. त्यांचेही महिला वर्गातून उत्स्फूर्त स्वागत होत आहे. मुलींच्या आणि युवकांच्या उच्च शिक्षणाची सोय, महिलांच्या आरोग्यासाठी दवाखान्यांची सोय, रस्ते, बसस्थानक, यासाठी अभिजित पाटील यांना निवडून देण्याचे आवाहन महिलांना केले जात आहे.